# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांकः31.05.2024 वारःशुक्रवार

1) लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातला प्रचार संपला; 57 मतदारसंघांत उद्या मतदान
2 छत्तीसगडमध्ये सोळा माओवाद्यांना अटक
3 ) थायलंड मधील बँकॉक इथ ऑलिंपिक स्पर्धांसाठीच्या पात्रता स्पर्धेत भारतीय खेळाडूंची चमकदार कामगिरी
आणि
4 ) उत्तरभारतात उष्णतेची लाट कमी होण्यास सुरुवात

**प्रचारसांगता**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातला प्रचार काल संध्याकाळी संपला. या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून ५७ लोकसभा मतदारसंघामध्ये उद्या, शनिवारी मतदान होणार आहे.
यामध्ये उत्तर प्रदेश आणि पंजाबमधील प्रत्येकी 13, पश्चिम बंगालमधील 9, बिहारमधील 8, ओडिशातील 6, हिमाचल प्रदेशातील 4, झारखंडमधील 3 आणि चंदीगडमधील एका जागेचा समावेश आहे. लोकसभा निवडणुकीच्या या टप्प्यात एकूण 904 उमेदवार रिंगणात आहेत. लोकसभा निवडणुकीच्या सर्व टप्प्यांची मतमोजणी येत्या ४ जून रोजी होणार आहे. तसंच आंध्रप्रदेश आणि ओदिशातल्या विधानसभा निवडणुकांची आणि देशभरातल्या विविध राज्यात झालेल्या विधानसभा पोटनिवडणुकांची मतमोजणी देखील ४ जून रोजीच होईल. अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम विधानसभा निवडणुकीची मतमोजणी मात्र २ जून रोजी होणार आहे.

**निवडणूकअफवा**

मतदानाच्या टक्केवारीत वाढ झाल्याची अफवा निराधार असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. याचं खंडन करत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं की, मतदानाची टक्केवारी कोणीही वाढवू शकत नाही, तसंच किती मतदान झालं यांची नोंद असलेल्या फॉर्म 17C ची प्रत उमेदवार आणि प्रतिनिधींना देण्यात आलेली आहे.मतदारांच्या मतदानाची माहिती आणि ईव्हीएमची सर्व माहिती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर अद्ययावत केल्याचंही राजीव कुमार यांनी सांगितलं.

**आचारसंहिता**

महाराष्ट्र राज्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची सर्व टप्पातील मतदान प्रक्रिया पूर्ण झाली असली; तरी आदर्श आचारसंहिता अद्यापपर्यंत सुरू आहे; त्यात कोणत्याही प्रकारची शिथिलता देण्यात आलेली नाही, असं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवलं आहे. निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर नवीन लोकसभा स्थापित झाल्याची अधिसूचना आयोगाकडून प्रसिद्ध होईपर्यंत आचारसंहिता कायम राहणार असल्याचं या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**माओवादी अटक**

सुरक्षा दलांनी छत्तीसगडमधल्या विजापूर जिल्ह्यातल्या विविध ठिकाणांहून सोळा माओवाद्यांना अटक केली आहे. यापैकी अकरा जणांना गोरना पडियारपारा परिसरातून, तर पाच जणांना भुसापूर परिसरातून अटक करण्यात आली. सुरक्षा दलांची हालचाल रोखण्यासाठी रअडथळा आणण आणि स्फोट घडवून आणणं अशा घटनांमध्ये या अटक करण्यात आलेल्या माओवाद्यांचा सहभाग होता, असं पोलिसांनी म्हटलं आहे.

**जम्मू-अपघात**

जम्मू आणि काश्मिरमध्ये जम्मू जिल्ह्यातल्या अखनूर विभागांत तुंगी मोर भागांत बस दरीत कोसळून काल झालेल्या अपघातातील मृतांची संख्या 22 झाली आहे; आणि 69 जण जखमी झाले आहेत. जखमींना अखनूर इथल्या जिल्हा रुग्णालयात तर गंभीर जखमींना जम्मूच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. भाविकांना घेऊन जाणारी ही बस जम्मू इथून राईसी जिल्ह्यातल्या शिव खोरी गुहेतील दर्शनासाठी प्रवास करत होती. यातले बहुतांश प्रवासी उत्तर प्रदेशमधील रहिवासी होते.अपघातग्रस्तांची ओळख पटवण्याचं काम सुरू असल्याचं जम्मू आणि काश्मिरचे वाहतूक पोलिस आयुक्त तेजिंदर सिंग तारा यांनी दिली. राष्ट्रपती दौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना दोन लाख रुपये आणि जखमींना पन्नास हजार रुपयांच्या मदतीची घोषणा पंतप्रधानांनी केली आहे. दरम्यान,जम्मूच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

**<u>पंतप्रधान कन्याकुमारी</u>**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल संध्याकाळी कन्याकुमारी इथल्या स्वामी विवेकानंद स्मारकात ध्यानधारणा सुरू केली.एक जून पर्यन्त ते ध्यानधारणा करणार आहेत. ध्यानधारणेला सुरुवात करण्यापूर्वी त्यांनी भगवती अम्मन मंदिरात देवीचं दर्शन घेतलं.एक जूनला विवेकानंद स्मारकाजवळ असलेल्या 133 फूट उंच तिरुवल्लुवर यांच्या पुतळ्याला मोदी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतील आणि त्याच दिवशी ते त्रिवेंद्रममार्गे दिल्लीला पोहोचणार आहेत.दरम्यान पंतप्रधानांच्या दौऱ्यामुळं किनारपट्टीच्या भागात तसंच सागरी सुरक्षा कडक करण्यात आली आहे.

**<u>रेवण्णा-अटक</u>**

लैंगिक छळ केल्याचा आरोप असलेले प्रज्वल रेवण्णा यांना आज पहाटे केंपेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन अटक करण्यात आली. इंटरपोलनं दिलेल्या माहितीनूसार कर्नाटक पोलीसांचं विशेष तपास पथक, बेंगलूरू पोलीस आणि विमानतळ प्राधिकरण यांनी रेवण्णा यांना अटक करण्याची तयारी केली होती. घरात काम करणाऱ्या महिलेचा लैंगिक छळ करून तिला धमकी दिल्याचा आरोप रेवण्णावर आहे, याप्रकरणाची विशेष तपास पथकाद्वारे चौकशी होण्याची शक्यता आहे. हसन लोकसभा मतदारसंघातील मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर,२७ एप्रिलला रेवण्णा देश सोडून निघून गेले होते.

**<u>उत्तराखंड-उपराष्ट्रपती</u>**

शेतकऱ्यांनी तांत्रिक प्रगती आत्मसात करण्याची गरज असल्याचं सांगत शेतकऱ्यांना शेतीशी संबंधित उद्योगांशी जोडण्याचं महत्त्व उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी अधोरेखित केलं.ते काल उत्तराखंडमधील उधम सिंह नगर जिल्ह्यातल्या गोविंद बल्लभ पंत कृषी आणि तंत्रज्ञान विद्यापीठाला भेट दिल्यानंतर बोलत होते. त्याआधी उपराष्ट्रपतींनी नैनिताल जिल्ह्यातल्या बाबा नीम करोरी आश्रमाला भेट दिली.

**<u>राज्यपालबैस-मुंबई</u>**

विकसित भारताचा राजमार्ग विकसित बंदरांमधून जातो. त्यामुळं विकसित राष्ट्र घडविण्यात देशातल्या बंदरांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे, असं प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी केलं.

ते काल मुंबईतल्या जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचा ३५ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

**<u>मणिपूर-पुर</u>**

मणिपूरमध्ये अचानक आलेल्या पुराचा कहर सुरूच असून इंफाळ शहराला पुराचा मोठा फटका बसला आहे. शहराकडं जाणारे बहुतांश रस्ते पाण्याखाली गेले आहेत. मणिपूर पोलीस, लष्कर, आसाम रायफल्स, एनडीआरएफ आणि एसडीआरएफ, आणि लोकटक विकास प्राधिकरण बचाव कार्यात सहभागी झाले आहेत.आत्तापर्यन्त सुमारे 800 लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे.पूरग्रस्त कुटुंबांसाठी जिल्ह्यात यापूर्वीच तीन तात्पुरती छावण्या सुरू करण्यात आल्या आहेत. या पुराच्या संकटामुळं मणिपूर राज्य सरकारनं सर्व सरकारी कार्यालयांना आज आणि उद्या सर्वसाधारण सुट्टी जाहीर केली आहे. राज्याच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागानंही सर्व शैक्षणिक संस्था १ जूनपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. पूरग्रस्तांना मदत देण्यासाठी चोवीस तास नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, इम्फाळमधील हवामान विभागानं पुढील दोन दिवस मणिपूरच्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा अंदाज वर्तवला आहे.

**<u>मुंबई -मध्यरेल्वे</u>**

ठाणे रेल्वे स्थानकातील फलाट रुंदीकरणाच्या कामासाठी 63 तासांच्या मेगाब्लॉकमुळे लोकल ट्रेनच्या किमान 930 फेऱ्या रद्द करण्यात येत असल्यानं मध्य रेल्वेनं मुंबईतल्या प्रवाशांना आज मध्यरात्रीपासून ते रविवारी दुपारपर्यंत लोकल ट्रेनमधून प्रवास टाळण्याचं आवाहन केलं आहे.

तसंच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावरही फलाट रुंदीकरणासाठी 36 तासांचा मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. सर्व आस्थापनांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना घरूनच काम करण्यास सांगावं असं मध्य रेल्वेनं सुचवलं आहे.

**<u>मुष्टि युद्ध स्पर्धा</u>**

थायलंड मधील बँकॉक इथ ऑलिंपिक स्पर्धांसाठीच्या पात्रता स्पर्धा सुरू आहेत . त्यात मुष्टियुद्ध प्रकारात 60 किलो वजनी गटात भारताच्या अंकूसीता बो रो ने काजकिस्तानच्या स्पर्धकाला 4-1 ने हरवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. भारत्तोलन क्रीडा प्रकारात 71 किलो वजनी गटात भारताच्या निशांत देव याने थायलंड च्या यीसूंगनोएन याला 5-0 ने हरवल. यापूर्वी भारताच्या अरुंधती चौधरी हिने भारत्तोलन मध्येच 66 किलो वजनी गटात उपउपांत्य फेरीत प्रवेश केलं आहे .

**<u>उष्णतेची-लाट</u>**

वायव्य आणि मध्य भारतातील उष्णतेची लाट आजपासून काही प्रमाणात कमी होण्यास सुरुवात होईल. यामुळं पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि ओडिशा या राज्यांमध्ये पुढील ४ दिवसांत २ ते ४ अंश सेल्सिअस तापमानात घट होईल. मध्य प्रदेश विदर्भ आणि उत्तराखंडमध्ये मात्र उन्हाची काहिली कायम राहील. असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. दरम्यान, नैऋत्य मान्सूनची आगेकूच सुरु असून केरळ आणि ईशान्येकडील राज्यात

तो पुढे सरकत आहे. पुढील 6 दिवसांत अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा आणि सिक्कीममध्ये तसंच महाराष्ट्रासह ओदिशा, छत्तीसगढ, मध्यप्रदेशमध्येही मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. तर दक्षिणेकडील केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, पुद्दुचेरी, आंध्र प्रदेश, तेलंगणा, लक्षद्वीप आणि अंदमान निकोबार बेटांवर पुढील 6 दिवसांत पावसाचा अंदाज आहे.

पाऊसनैर्ऋत्य मोसमी पाऊस काल केरळमध्ये दाखल झाला असून, ईशान्य भारताच्या बहुतेक सर्व भागात तो पुढे सरकल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. यंदा मान्सून आपल्या १ जून या नेहमीच्या वेळेच्या दोन दिवस अगोदरच दाखल झाला आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत कर्नाटक, तमिळनाडू आणि पुडुचेरीसह दक्षिण भारताच्या उर्वरित भागात मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती असून पश्चिम बंगाल आणि सिक्कीमच्या डोंगराळ प्रदेशासह ईशान्य भारताच्या सर्व भागांमध्ये तो पोहोचेल, असं हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय मोहपात्रा यांनी सांगितलं.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं , नमस्कार.